GLOBAL ALLIANCE FOR Mass Entrepreneurship

# ग्लोबल अलायन्स ऑफ मास आंत्रेप्रीन्युअरशीप (गेम) व एसआयडीबीआय सहयोगाने एनबीएफसी ग्रोथ ॲक्सेलरेटर प्रोग्राम डिझाइन व अंमलबजावणी करणार

**बेंगळुरू, जून** ७,२०२३: ग्लोबल अलायन्स ऑफ मास आंत्रेप्रीन्युअरशीप (गेम)ला शाश्वत व स्केलेबल एनबीएफसी ग्रोथ ॲक्सेलरेटर प्रोग्राम (एनजीएपी) डिझाइन व संरचित करण्यासाठी एसआयडीबीआयकडून तत्वत: मान्यता मिळाली आहे. हा भारतातील अनोखा प्रोग्राम आहे.

पहिल्या टप्प्यात प्रोग्राममध्ये सर्वसमावेशक, कृतीशील, ग्रॅन्युलर अहवालासह प्रोग्राम संरचना, धोरण आखणी आणि गेमद्वारे एनजीएपीसाठी अंमलबजावणी योजना यांचा समावेश आहे. अहवालामध्ये जवळपास २० एनबीएफसींचे मूल्यांकन व निवडीसाठी निकषाचा देखील समावेश असेल, जे आकाराने लहान आहेत, पण पायलट समूहाचा भाग होण्यासाठी एमएसई विभागावर लक्ष केंद्रित करतात.

एनजीएपीचा जागतिक ॲक्सलेटर्सच्या आधारावर संरचित मॉडेल असण्याचे ध्येय आहे, ज्यामुळे लघु एनबीएफसींना तृतीय व चतुर्थ श्रेणीच्या शहरांमधील एमएसईंच्या किंवा दीर्घकालीन मूल्य साखळीमध्ये किमान पुरवठादार म्हणून सेवा देणाऱ्या शहरी एमएसईंच्या गरजांची पूर्तता करण्यास मदत होईल, ज्यामुळे त्यांच्या क्षमता वाढतील आणि ते बँका किंवा मोठ्या एनबीएफसींकडून संस्थात्मक निधीसाठी पात्र ठरतील. या प्रोग्राममध्ये बेसलाइनवर पोहोचण्यासाठी आणि एनबीएफसींना वाढ करण्याकरिता अचूक क्षमता निर्माण हस्तक्षेपांसाठी असेसमेंट फ्रेमवर्कचा समावेश असेल. हे हस्तक्षेप मोठ्या इकोसिस्टममधून तज्ञ व मार्गदर्शकांचा फायदा घेतील आणि विविध आकारमानांचा समावेश असेल. यामध्ये एसआयडीबीआयकडून, तसेच क्षमता निर्माण उपक्रमामधून प्रबळपणे उदयास येणाऱ्या अशा एनबीएफसींकडून निधींचा समावेश आहे, ज्यामधून निदर्शनास येते की बँका/एफआयकडून निधीकरिता अर्ज करण्यासाठी समूह सहभागींच्या सुसज्जतेचे प्रोग्रामच्या शेवटी थर्ड-पार्टी ऑडिटद्वारे मूल्यांकन करण्यात येईल.

एनजीएपी ऑगस्ट २०२३ पासून एसआयडीबीआयच्या सक्रिय सहभागासह सादर करण्याची अपेक्षा आहे.

**एसआयडीबीआयचे सीएमडी श्री. शिवसुब्रमण्यम रामण** म्हणाले, ''एसआयडीबीआय विकास संस्था म्हणून विविध भौगोलिक क्षेत्रांमध्ये आणि विभागांमध्ये लहान एनबीएफसींच्या क्षमता निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे, ज्यामुळे ते वाजवी दरांमध्ये बँक क्रेडिट मिळण्यास सक्षम होतील. यामुळे एमएसएमई क्षेत्राला साह्य करण्यास गती मिळेल. एनजीएपीने एनबीएफसीच्या एकूण कार्यसंचालनामध्ये येणाऱ्या अडथळयांचे निराकरण करण्यास मदत केली पाहिजे आणि बँकांना लहान अनरेटेड एनबीएफसींना कर्ज देण्यास अधिक आत्मविश्वास दिला पाहिजे.''

या सहयोगाबाबत आपले मत व्यक्त करत **गेमचे संस्थापक श्री. रवी वेंकटेशन** म्हणाले, ''एनजीएपी फ्रेमवर्कचे अल्टिमेट ध्येय एनबीएफसींच्या मोठ्या समूहाला किफायतशीर दरामध्ये संस्थात्मक निधी उपलब्ध होण्यास सक्षम करण्याचे आहे, ज्यामुळे फायदा एमएसएमईकडे हस्तांतरित करता येऊ शकतो. एनबीएफसी एमएसएमई विभागाला सेवा देण्यासाठी उत्तमरित्या स्थित आहेत आणि क्षमता निर्माणचे मॉडेल तयार करत एनजीएपी निधीसाह्य करणाऱ्या संस्था, एनबीएफसी व एमएसएमईंना फायदे देणारे

GLOBAL ALLIANCE FOR Mass Entrepreneurship

शाश्वत मॉडेल असेल. एनजीएपी प्रबळ एनबीएफसीचा समूह एमएसएमईंना मोठ्या प्रमाणात कर्ज देण्यावर लक्ष केंद्रित करण्याची खात्री घेईल."

**गेम बाबत:**

गेमचा भारतातील मास आंत्रेप्रीन्युअरशीप (एमई)च्या क्षमतांना अनलॉक करण्याचा मनसुबा आहे. रवी वेंकटेशन, मदन पडकी व मेकिन महेश्वरी या तीन प्रख्यात उद्योजकांनी ऑगस्ट २०१८ मध्ये आधारस्तंभ संस्था म्हणून सुरू केलेली गेमइकोसिस्टमशी संलग्न आहे आणि भारतातील रोजगार निर्मितीमधील आव्हानांचे पद्धतीशीरपणे निराकरण करण्यासाठी कृतीला चालना देते. गेमचा सहयोग, भागीदार, निधी देणारे आणि देशभरात उद्योजकता चळवळीला प्रेरित करण्यामध्ये मदत करू शकणाऱ्या इकोसिस्टममधील इतर कंपन्यांच्या क्रॉस-सेक्शनला एकत्र आणण्याचा मनसुबा आहे. विद्यमान व नवीन उद्योगांच्या विकासासाठी मास आंत्रेप्रीन्युअरशीपच्या भारतभरातील चळवळीला चालना देण्याचे कंपनीचे मिशन आहे, ज्यामुळे २०३० पर्यंत ५० दशलक्ष नवीन रोजगार निर्माण होतील, जेथे महिला २५ टक्के व्यवसायांच्या मालक असतील. अधिक माहितीसाठी कृपया भेट द्या: https://massentrepreneurship.org/